चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

३० एप्रिल, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस १० वर्ष कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन गडचांदुर अंतर्गत अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस २९/०४/२०१९ रोजी **कु. स.ज. अन्सारी. जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. २ चंद्रपुर यांनी १० वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.**

पोलीस स्टेशन गडचांदुर अंतर्गत मौजा बेलमपुर ता. राजुरा येथे दिनांक १३/०९/२०१६ रोजी यातील **आरोपी नामे विकास श्रावण सिडाम, वय २१ रा. बेलमपुर ता. राजुरा, जि. चंद्रपुर** यांने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीच्या अज्ञानाचा फायदा घेवुन तिचेवर अत्याचार केला. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन गडचांदुर येथे अप.क्र. ४६२/२०१६ कलम ३७६ (२)(आय) भादंवि सहकलम ३,४,५,६ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास मपोउपनि कविता पुसे, पोस्टे गडचांदुर यांनी पुर्ण करून आरोपी विरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २९/०४/२०१९ रोजी **आरोपी नामे विकास श्रावण सिडाम, वय २१ रा. बेलमपुर ता. राजुरा, जि. चंद्रपुर यास** कलम ३७६ (२)(आय) भादंवि सहकलम ३,४,५,६ पोक्सो **मध्ये १० वर्ष कारावासाची शिक्षा व ५,०००/—रू दंड न भरल्यास ६ महिने शिक्षा** ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकार तर्फे **ॲड. देवेंद्र महाजन, सरकारी अभियोक्ता, तर कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. गिरिजाशंकर यादव, पोस्टे गडचांदुर** यांनी काम पाहिले.

———————————————————————————————